## सहसंचालक, नगर रचना, मूल्यांकन कार्यालयातील कामकाज

(FUNCTIONS IN JOINT DIRECTOR OF TOWN PLANNING, VALUATION OFFICE)

वार्षिक मूल्यदर तक्ते तयार करण्याची प्रक्रिया महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे खरे बाजारमूल्य निश्चित करणे) नियम, 1995 अन्वये ठरवून देण्यात आली आहे त्यानुसार -

- राज्यातील मुंबई, पुणे, कोकण, नाशिक, नागपूर व अमरावती या प्रादेशिक विभागांसाठी उपसंचालक / सहायक संचालक, नगर रचना, मूल्यांकन हे वार्षिक मूल्यदर तक्ते तयार करण्याविषयीचे काम करतात. तर औरंगाबाद व लातूर या दोन प्रादेशिक विभागांचे हे काम औरंगाबाद येथील सहायक संचालक, नगर रचना, मूल्यांकन यांचेकडून केले जाते.
- उपसंचालक / सहायक संचालक, नगर रचना, मूल्यांकन हे वार्षिक मूल्यदर तक्त्यांचे प्रस्ताव तयार करुन सहसंचालक, नगर रचना, मूल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत नोंदणी महानिरीक्षक तथा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांचेकडे मान्यतेसाठी सादर करतात.

नोंदणी महानिरीक्षक तथा मुख्य नियंत्रक, महसूल प्राधिकारी यांचे मान्यतेनंतर वार्षिक मूल्यदर तक्ते अंतिम केले जातात व प्रत्येक वर्षाच्या 1 एप्रिल पासून ते अंमलात येतात.